# लैंगिक शिक्षण आणि लोकसंख्या नियंत्रण

गेली काही वर्षे लैंगिक शिक्षण या विषयावर उलटसुलट चर्चा होत आहे. लैंगिक शिक्षण म्हटले की, अनेकांच्या भुवया ताणल्या जातात. हे द्यावं की न द्यावं, द्यावं तर कसं द्यावं, कशा पद्धतीने द्यावं यासंबंधी ही चर्चा असते. लहानपणी मुलं-मुली एकत्र खेळतात पण ती जसजशी मोठी होत जातात तसं त्याचं आपापसातलं खेळणं कमी होत जातं व नंतर ते थांबतं; हे का घडतं, हे आपल्याला माहीत आहे. मुलं-मुली लहानाची मोठी होत असताना त्यांच्यात शारीरिक बदल घडत असतात. याला आपण 'वयात येणं' असं म्हणतो. या काळात मुलं आणि मुली यांच्यावर विशिष्ट हार्मोन्सचा प्रभाव दिसू लागतो व त्यांच्यात विशिष्ट शारीरिक बदल घडतात. या हार्मोन्समुळे मानसिक बदलसुद्धा घडतात. मुलां-मुलींसाठी वयात येण्याचा हा काळ कठीण असतो. शरीरात होत असलेल्या बदलांची जाणीव त्यांना होत असते. पण त्यांचा अर्थ समजत नसतो. त्यांच्यात विरुद्धलिंगी आकर्षण निर्माण होतं, मात्र त्याची स्पष्ट जाण नसल्याने ते गोंधळात पडतात. त्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं त्यांना कोणाकडूनच मिळत नाहीत. त्यामुळे या वयातल्या मुलांकडून चुका घडू शकतात. काही वेळा अशा चुकांची मोठी किंमत त्यांना चुकवावी लागते. आतापर्यंत हा विषय अस्पर्शित, बोलूच नये असा मानला गेला आहे. त्यामुळे पौगंडावस्थेतील मुलांची होणारी कोंडी लक्षात घेतली तर त्यांना योग्य पद्धतीने, योग्य असा बांध घालून लैंगिक शिक्षण दिलं गेलं, तर त्यांची कोंडी फुटू शकते. ते चांगल्या प्रकारे त्यांच्या शारीरिक-मानसिक बदलांना सामोरे जाऊ शकतील. ते आत्मविश्वासाने तारुण्यात पदार्पण करू शकतील. त्यातून एक चांगली पिढी आकाराला येईल व त्यातून लोकसंख्या वाढीवर नियंत्रणही स्थापित होऊ शकेल, असं मला वाटतं.

प्रजनन व त्याला आनुषंगिक बाबींच्या संदर्भात सर्व प्राणीमात्रांमध्ये होमो सेपिअन म्हणजे माणूस या प्राण्यामध्ये सर्वाधिक गुंतागुंत आढळून येते. माणूस हा सस्तन प्राणी आहे, मानवाशिवाय आणखीही अनेक सस्तन प्राणी आहेत. सस्तन आणि इतर अशा सर्वच जीवांमध्ये नर व मादी अशी विभागणी आढळते. माणसाच्या बाबतीत ही विभागणी आपण पुरुष व स्त्री अशी करतो. बहुतेक पशु-पक्ष्यांमध्ये प्रजननासाठी नर व मादी यांचं मीलन महत्त्वाचं असतं. स्त्री किंवा मादी स्त्रीबीज निर्माण करते. पुरुष किंवा नरामध्ये शुक्रजंतूंची निर्मिती होते. शुक्रजंतूंचा स्त्री बिजाशी संयोग झाल्यानंतर बीज फलित होते, म्हणजे गर्भधारणा होते. माणूस तसंच इतर काही सस्तन प्राण्यांमध्ये स्त्रीच्या/मादीच्या गर्भाशयात गर्भाची वाढ होते व ठराविक कालावधी पूर्ण झाल्यानंतर ती मुलांना /पिलांना जन्म देते. काही पशूपक्षी अंडी घालतात व ती उबवतात त्यानंतर या अंड्यातून पिलू जन्माला येतं. माशांसारख्या काही जलचर प्राण्यांमध्ये शरीराच्या बाहेर गर्भधारणा घडते. मादी अंडी सोडते तर नर शुक्राणू सोडतो आणि बाहेरच बीज फलित होते व त्यातून नवा जीव जन्माला येतो. माणूस वगळता इतर पशुपक्ष्यांमध्ये प्रजननाचा एक ठराविक काळ असतो. या काळात मादी माजावर येते व नर तिच्याकडे आकर्षित होतात. त्यांचं लैंगिक जीवन या काळापुरतंच असतं, उर्वरित काळात ते सामान्य जगतात. उदाहरणार्थ, कुत्रा, मांजर वगैरे. पक्ष्यांच्या बाबतीत या काळाला विणीचा हंगाम म्हटलं आहे. बहुधा माणसाच्याच बाबतीत प्रजननाचा किंवा विणीचा असा कोणताही हंगाम नाही. मनुष्यामध्ये वर्षभराच्या कोणत्याही काळात गर्भधारणा होऊ शकते व मूल जन्माला येऊ शकते. हे आपण लक्षात घेतलं तर मानवी लोकसंख्यावाढीचा एक पैलू आपल्याला समजेल व त्यातून लोकसंख्या नियंत्रणाची तसंच लैंगिक शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होईल.

माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे. बुद्धीच्या बळावर त्याने विकास साधला आहे, असं आपण एका बाजूने म्हणतो परंतु लैंगिक शिक्षणाच्या आणि लोकसंख्या नियंत्रणाच्या बाबतीत मात्र तो अत्यंत मागसलेला आणि बुरसटलेल्या विचारांनीयुक्त असा प्राणी आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आज वर्तमानपत्रातून लैंगिक अत्याचाराच्या अनेक बातम्या आपल्याला दिसतात. वृद्ध स्त्री असेल किंवा बालिका असेल कोणीही या अत्याचारातून सुटताना दिसत नाही. 'गँगरेप'सारख्या घटना कुठे ना कुठेतरी दररोज घडत असल्याचं आढळून येतं. केवळ स्त्रिया किंवा मुलीच नाहीत तर लहान मुलांवर (मुलगे) लैंगिक अत्याचार होत असतात. कधीकधी स्त्रियांकडूनही

पुरुषांच्या बाबतीत अशा घटना घडतात. अन्य प्राणी कपडे घालत नाहीत, नैसर्गिक स्थितीतच ते वावरतात. माणूस कपडे घालतो आणि सुसंस्कृतपणाचा आव आणतो पण त्याचे लैंगिक बाबतीतले वर्तन इतकं हीनपणाचं आहे की या बाबतीत या भूतलावरील इतर प्राणी खरे सभ्य आहेत, असं म्हणावं लागेल. वनस्पतींच्या बाबतीत आपण पाहिलं तर आंब्याच्या एखाद्या झाडाला दाब कलम करून दुसरं झाड आपण तयार करू शकतो. अनेक फुलांमध्ये पुंकेसर आणि स्त्रीकेसर दोन्हीही समाविष्ट असतात. फूल, फळ, बीज आणि बीजापासून पुन्हा झाड अशी पुनरुत्पादन प्रक्रिया वनस्पतींमध्ये घडते. यादृष्टीने वनस्पती पूर्ण रूप असतात. नर आणि मादी असा भेद पशुपक्ष्यांमध्ये आणि मनुष्यामध्ये असतो. त्यातही इतर सर्व प्राणिमात्रांमध्ये प्रजनन यासाठीच नर-मादी संबंध येतो, त्याकरिता ठराविक काळ, ठराविक ऋतू असतो. मनुष्याचं लैंगिक वर्तन मात्र अनिर्बंध असल्याचं दिसतं. लैंगिक शिक्षणातून या वर्तनावर काही प्रमाणात तरी बंधनं येऊ शकतात.

मूलत: आपली संस्कृती हेच सांगते की, स्त्री व पुरुष हे एकच आहेत. एका व्यक्तित्वाचे भाग आहेत. दोन्ही मिळून हे व्यक्तित्व पूर्ण होतं. आपल्याकडे अर्धनारीनटेश्वराची जी संकल्पना आहे ती हीच आहे. शिव आणि पार्वती हे एकच आहेत. हजारो वर्षांपासून हे सांगितलं जात आहे. 'एखाद्या यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते' किंवा 'एखाद्या यशस्वी स्त्री मागे एक पुरुष असतो' अशी विधानं आपण करतो, तेव्हा त्याचा अर्थ हाच असतो की स्त्रीशिवाय पुरुष किंवा पुरुषाशिवाय स्त्री हे अपूर्ण असतात. त्यांच्या एकत्र येण्याने पूर्णत्व येते. आपण शिवलिंग स्थापित करून त्याची पूजाअर्जा करतो, यामागची भावना काय आहे? तर ही एक उदात्त भावना आहे. लैंगिक व्यवहाराबद्दलचं पावित्र्य आपल्याला समजावं आणि आपण त्याचं पालन करावं, ही भावना इथे आहे. लैंगिकतेबद्दलचा जो स्वच्छ व मोकळा दृष्टिकोन इतर सर्व प्राण्यांमध्ये आहे त्याची शिकवण आपल्या संस्कृतीत वेगवेगळ्या प्रतीकांमधून फार पूर्वीपासून दिली गेली आहे हे आपण लैंगिक शिक्षणाचा विचार करताना लक्षात घेतलं पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे इतर प्राण्यांमध्ये निसर्गाने नराला सौंदर्य बहाल केल्याचं दिसतं. मग ते सौंदर्य शरीराचं असेल, ताकदीचं असेल, आवाजाचं असेल, शौर्याचं असेल किंवा शिस्तपूर्ण वागण्याचं असेल. नराने मादीला आकर्षित करावं अशी रचना त्यामध्ये दिसते. माणसाच्या बाबतीत मात्र उलट घडलेलं दिसतं. मनुष्यप्राण्यात

सौंदर्याचं वरदान स्त्रीला लाभलं आहे. स्त्री पुरुषाला आकर्षित करते किंवा पुरुष स्त्रीकडे आकर्षिले जातात. ज्याने कुणी ही रचना केली असेल त्याच्या हातून ही चूक झाली असेल, असं माझं वैयक्तिक मत आहे. या चुकीचा परिणाम म्हणजे आजचा सौंदर्याचा व्यापार. स्त्रियांच्या सौंदर्य प्रसाधनांच्या जाहिरातींमध्ये स्त्री असणं स्वाभाविक आहे पण पुरुषांच्या गोष्टी असतील तरी त्या जाहिरातीमध्ये स्त्री असली पाहिजे हा अट्टाहास केला जात आहे. वस्तू कुठलीही असो स्त्रीच्या माध्यमातूनच तिला एक्स्पोजर दिलं जातं. या परिस्थितीकडे गंभीरपणे पाहाण्यास कोणीही तयार नाहीये. हा एक चुकीचा पायंडा पडला आहे. पुरुषांच्या शेव्हिंग क्रीमची जाहिरात असेल, या जाहिरातीतल्या ब्लेडने पुरुषाची अगदी क्लीन शेव्ह झाली असेल पण त्याच्या गालावरून हात फिरवणारी स्त्री दाखवल्याशिवाय या जाहिरातीला पूर्णत्व प्राप्त होत नाही. या ब्लेडने क्लीन शेव्ह झाल्याचं प्रमाण स्त्रीने पुरुषाच्या गालाला स्पर्श करण्यातूनच मिळतं; किंवा एखादा डिओडरन्ट आहे. पुरुषाने तो वापरल्यानंतर त्याच्या मागे स्त्रिया फिरताना त्या डिओडरन्टच्या जाहिरातीत दाखवल्या जातात. जाहिरात वस्तूची असते, पण तिच्याबरोबर स्त्रीचं तिच्या सौंदर्याचं वस्तुकरण अशाप्रकारे केलं जात आहे. व्यवसायाच्या दृष्टीने कदाचित त्याची गरज असेल. तरीही या माध्यमातून कळत-नकळतपणे लैंगिक भावना जाग्या केल्या जात असतात. लैंगिक संदर्भात काही भ्रामक समजुती त्यातून तयार होतात, तरुणांची मन कलुषित होतात, हे चुकीचं आहे.

आज अगदी सर्रास दारू-सिगारेटपासून लैंगिक साधनांपर्यंत जाहिराती केल्या जातात. अशा जाहिरातीमध्ये 'मर्दपणा'ची आवश्यकता म्हणून या गोष्टी दाखवल्या जातात, हे किती चुकीचं आहे. हे किती भ्रामक आहे आणि विशेषत: आरोग्याला किती घातक आहे, हे आपण जाणतो. तरीही या जाहिरातीच्या खोटेपणास खरं मानून अनेकजण आपल्या आयुष्याची नासाडी करून घेत असतात. लैंगिक शक्ती वाढवण्याच्या जाहिराती, तत्संबंधी वेगवेगळ्या प्रकारची औषध, लैंगिक विकारांवर रामबाण उपाय वगैरेंची जाहिरात पत्रकं स्वच्छता गृहामध्ये, सार्वजनिक ठिकाणी सर्रास चिकटवलेली आढळतात. या जाहिरातींमधील दावे खरे असतात का? ते कोणी तपासलेले असतात का? मुळात या जाहिराती सार्वजनिक ठिकाणी लावायला कोण परवानगी देतं? अशाप्रकारच्या लैंगिक समस्या असलेला वर्ग फार तर एखादा टक्का असेल मग त्याच्या जाहिराती शंभर टक्के लोकांमध्ये का केल्या जातात? लैंगिक विकारासंबंधी उपचार करणाऱ्या एखाद्या अधिकृत क्लिनिकमध्ये असे विकार



असलेल्या लोकांना माहिती द्यावी, त्यांच्यावर उपचार करावेत, सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या जाहिराती करण्याची काय गरज आहे? मूलत: या अशा जाहिराती लोकांच्या लैंगिक अज्ञानाचा फायदा घेण्याठी असतात. त्यातून एखादं भय निर्माण केलं जातं व अनेक लोक या भयाला बळी पडतात. हे खूप चुकीचं आहे. विशेषत: याचा पौगंडावस्थेतील मुलांच्या मनावर गंभीर परिणाम होऊ शकतो. लैंगिक अज्ञान हे लैंगिकतेबद्दलच्या शास्त्रीय शिक्षणातूनच योग्य प्रकारे दूर होऊ शकतं आणि अशा 'मर्दपणा'च्या भ्रामक जाहिरातींना भुलल्यामुळे होणारा अनिष्ट परिणाम टाळता येऊ शकतो.

पण या बाजूकडे दुर्लक्ष होत आहे. आज सिनेमा, नाटक, गाण्यांचे अल्बम, टी.व्ही. वरील कार्यक्रम, व्हीडिओ, इंटरनेट अशा साऱ्या माध्यमांतून लैंगिक आकर्षण तरुण मुलां-मुलींच्या मना-मेंदूवर बिंबवलं जात आहे. त्याचे ढोल वाजवले जात आहेत आणि तरुण मुलं-मुलीही त्यात वाहवत आहेत. लैंगिकतेच्या भ्रामक-विकृत कल्पनांमध्ये ती जगताहेत. याचे त्यांच्या भावी आयुष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात. माध्यमांच्या या स्वैराचारामुळे आज अगदी लहान वयात लैंगिक संबंधाचं आकर्षण बळावताना दिसत आहे. अर्धवट ज्ञान पूर्ण अज्ञानापेक्षा घातक ठरतं असं म्हणतात. ज्या वयात शिक्षण घ्यायचं, ज्ञानी व्हायचं, त्या वयात मूलं चुकीच्या विचारांनी भरकटत आहेत; म्हणजे ब्रह्मचर्याश्रमात शिक्षणामध्ये लक्ष एकाग्र करण्याऐवजी अनेक तरुण मुलं-मुली गृहस्थाश्रमाप्रमाणे एकत्र राहताना दिसतात. विशेषत: काही दुसऱ्या देशांमध्ये डेटिंगचं फॅड प्रचंड आहे व ते आता आपल्याकडेही येऊ लागलं आहे. वेगवेगळ्या माध्यमातून लैंगिकतेला वेडवाकडं सजवणं सुरू आहे. त्याच्या परिणामांचा विचार करताना कोणी दिसत नाही. भावी पिढ्यांवर याच्या होणाऱ्या परिणामाचा विचार कोण करतंय असं वाटत नाही. लैंगिकतेच्या अतिरेकाचा एक परिणाम 'एड्स' हा रोग आहे. गेल्या तीस वर्षांत या रोगाने असंख्य बळी घेतले आहेत. 'एड्स' सारखे आणखी काही रोग या अतिरेकामुळे निर्माण होऊ शकतात, म्हणूनच यावर कुठेतरी नियंत्रण आवश्यक आहे. लैंगिक शिक्षण यासाठी उपयुक्त ठरू शकतं.

या नियंत्रणासाठी अगदी छोट्या छोट्या गोष्टी करता येऊ शकतात. उदा. लहान मुला-मुलींच्या शाळा स्वतंत्र ठेवता येऊ शकतात, त्याचप्रमाणे मुला-

मुलींसाठी महाविद्यालयेही स्वतंत्र ठेवता येऊ शकतील. मुलां-मुलींना लैंगिक विषयाच्या बाबतीत व्यवस्थितपणे शिक्षण दिलं गेलं पाहिजे. आपला वंश पुढे गेला पाहिजे हे माणूस असो की अन्य कोणताही प्राणी, त्याचं मूलभूत ध्येय असतं. 'वंशाचा दिवा' हे शब्द वरचेवर आपल्या कानावर पडतात. आपल्याला आपल्या पूर्वजांकडून मिळालेल्या जीनपैकी काही जीन पुढच्या पिढीत जातात. याला आपण आपला वंश पुढे जाणे म्हणतो. परंतु, केवळ वंश वाढवला म्हणजे पुरुषार्थाचा झेंडा लावला असे आहे काय? आपला हा वंश पुढे जाऊन एक चांगला सुसंस्कृत माणूस झाला पाहिजे ही सुद्धा आपली जबाबदारी आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. तुम्हाला कशा प्रकारची पुढची पिढी तयार करायची आहे- बुद्धिमान, ताकदवान, सुसंस्कृत पिढी तयार करायची असेल तर आपलं वर्तन आपण तसं घडवलं पाहिजे. हे निश्चित आहे की स्त्रीपुरुष एकत्र आल्या-शिवाय प्रगती होणार नाही. लैंगिक शिक्षणाच्या प्रक्रियेतूनच माणसाची मानसिकता आणि दुसऱ्या माणसाला समजण्याची प्रक्रिया ही अधिक चांगली होऊ शकते. लैंगिक शिक्षणाचा उपयोग माणसाच्या मनाचा, शरीराचा प्रवाह-उद्रेक शमविण्यासाठी, त्याला नियंत्रित करण्यासाठी होऊ शकतो. एखादी उफाळलेली लाट ज्याप्रमाणे समुद्रातील खडकांमध्ये विलीन होते त्याचप्रमाणे लैंगिक भावनेचा निचरा होऊन माणसाचं मन शांत व स्थिर होण्यासाठी लैंगिक शिक्षण उपयोगी पडू शकतं. त्याचा अंतिमत: उपयोग पुढची पिढी सक्षम व चांगल्या विचारांची होण्यासाठी होऊ शकतो.

पूर्वी काही वेगवेगळ्या माध्यमातून लैंगिक शिक्षण मिळायचं. आसपासचा निसर्ग हाच एकप्रकारे शिक्षक होता. या निसर्गात पशु-पक्षी, झाडं असे सारे घटक होते. एकत्र कुटुंब पद्धती होती. घरात कुणाचं तरी लग्न व्हायचं, कोणीतरी गरोदर व्हायचं, कोणी तरी मुलाला जन्म द्यायचं, कोणाचा तरी मृत्यू व्हायचा. अशाप्रकारे निसर्गाच्या प्रक्रियेतून आणि कुटुंबातल्या घडामोडींतून हळूहळू जीवनापासून मृत्यूपर्यंत सगळ्या गोष्टींची जाण यायची. यातून लैंगिक शिक्षणसुद्धा आपोआप घडायचं. चिमणाचिमणी, कोंबडा-कोंबडी वगैरे प्राण्यांच्या वर्तनातून समज यायची. काही गोष्टी वाचनातून समजत जायच्या, काही गोष्टी मित्र-मैत्रिणींकडून कळायच्या, कधी वडिलधारी मंडळी, शिक्षक वगैरेंकडून समजायच्या त्यामुळे वयानुरूप प्रकट होणाऱ्या भावनासुद्धा नियंत्रित मार्गाने जायच्या.

आज मात्र लैंगिकतेचा विस्फोट होत असल्याचं चित्र दिसत आहे. लैंगिकता किंवा सेक्स हा व्यापारच झाला आहे. 'सेक्स टुरिझम' नावाने भलताच प्रकार सुरू झाला

आहे. काही देश यासाठी ओळखले जाऊ लागले आहेत. हे वाईट आहे, एकीकडे आपण म्हणतो तो माणूस एवढी प्रगती करत आहे आणि दुसरीकडे किती खालच्या पातळीचा विचार माणूस करत आहे. माणसाची इतकी बौद्धिक, मानसिक प्रगती होत असताना अजूनही स्त्री उपभोगाची वस्तू मानली जाते, तिचा व्यापार केला जातो, हे लाजिरवाणे आहे. हे कुठेतरी थांबवलं पाहिजे. आज समाजात ज्या विकृती दिसतात त्या यातूनच निर्माण होतात. हे लक्षात घेतलं पाहिजे म्हणूनच अशा गोष्टींना पायबंद घातला गेला पाहिजे तरच भावी पिढी आणखी आरोग्यदायी, आणखी सुदृढ होऊ शकेल. लैंगिक शिक्षणामुळे भावी पिढी अधिक सुस्पष्ट अशा विचारांची होऊ शकेल.

लैंगिक शिक्षणाबरोबरच लोकसंख्या वाढ आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामांची जाण देखील समाजात वाढली पाहिजे. कौरव शंभर होते आणि पांडव पाच होते हे आपल्याला माहीत आहे. धृतराष्ट्राची पत्नी गांधारीने शंभर पुत्रांना जन्म दिला आणि पंडूच्या कुंती व माद्री या दोन पत्नींनी मिळून पाच पुत्रांना जन्म दिला. शंभर कौरवांपेक्षा पाच पांडव अधिक पराक्रमी ठरले; कर्तृत्ववान ठरले. तुम्ही किती मुलांना जन्म दिलाय यापेक्षा तुमची किती मुलं कर्तृत्ववान आहेत हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्ही कमी मुलांना जन्म दिला तर तुमची मुलं जास्त कर्तृत्ववान होण्याची शक्यता अधिक असते. कारण मुलं कमी असतील तर तुम्ही त्यांचं संगोपन व्यवस्थित करू शकता, त्यांना चांगला आहार देऊ शकता, त्यांना चांगलं शिक्षण देऊ शकता, त्यांची चांगली देखभाल करू शकता. त्यांना चांगलं प्रोत्साहन देऊ शकता, त्यांना चांगले नागरिक घडवू शकता. आपल्याला माहीत आहे की अणू ही अशी ऊर्जा आहे, ती जर नियंत्रित स्वरूपात तयार केली तर तिचा वापर समाजाच्या उपयोगासाठी होऊ शकतो, पण तिचा जर अयोग्य अनिर्बंध वापर केला तर मनुष्याच्या असंख्य पिढ्या बरबाद करणारा स्फोट होऊ शकतो. तसंच लैंगिकतेचा व्यापार, जाहिरातबाजी, वेगवेगळ्या अंधश्रद्धा, वेगवेगळ्या स्वरूपाचं राजकारण, शासनाचं दुर्लक्ष या गोष्टींमुळे होणारा लैंगिक स्फोट लोकसंख्येच्या स्फोटात परिवर्तित होऊ शकतो. एकीकडे लोकसंख्या प्रचंड वाढत आहे मात्र दुसरीकडे कार्यक्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. चांगली माणसं मिळत नाहीत ही तक्रार सर्वच क्षेत्रांत ऐकू येत आहे. माणूस माणसाला माणसाप्रमाणे वागवायला तयार नाही अशा परिस्थितीत आपण लैंगिक शिक्षणाचा व लोकसंख्या नियंत्रणाचा फेरआढावा घेण्याची गरज आहे.

'वंशाचा दिवा' या संकल्पनेचाही फेरविचार करण्याची गरज आहे. वंशाचे

दिवे पेटवण्याच्या नादात स्त्रीभ्रूणहत्या घडत आहेत. त्यामुळे स्त्रीला जन्माला येण्याची संधीच नाकारली जात आहे. समाजातील स्त्री-पुरुष समतोल ढासळत चालला आहे, हे सुसंस्कृत म्हणवून घेणाऱ्या समाजाला भूषणावह आहे का? तुम्हाला एकच मुलगी असली तरी नाराज होऊ नका. माणसं जास्त आत्मकेंद्री झाली आहेत. तुम्ही तुमच्या स्वत:चा, कुटुंबाचा विचार करत असाल, तर ते चांगलंच आहे, पण तुम्ही समाजाचाही विचार केला पाहिजे. स्वत:ला जगवा आणि इतरांनाही जगवा, स्वत:साठी जगा आणि इतरांसाठीही जगा. हे तुमचं ब्रिद असलं पाहिजे. मीच सगळे आंबे खाणार आणि पुढच्या पिढीला आंबे मिळू नयेत म्हणून सारी झाडेही तोडणार हा उद्योग बरोबर नाही. स्त्रीभ्रूणहत्या म्हणजे नेमके हेच होत आहे.

स्त्री आणि पुरुष या एकाच जातीच्या व्यवस्था आहेत, त्यांच्यात आकर्षण असणार हे गृहीतच आहे पण आज आपण भोवताली पाहिलं तर याबाबतीत समाजाची किती घसरण झाली आहे, हे आपल्या लक्षात येईल. आज पालकांकडून मुलामुलींना वाजवीपेक्षा अधिक ढील दिली जात आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे. कदाचित नवा जमाना आहे, आता हे चालणारचं असं वाटत असेल, पण याचा गंभीर विचार झाला पाहिजे. काही ना काही स्वरूपात नियंत्रण हे असलं पाहिजे. आजसुद्धा हुंडाबळी होतात, प्रेमविवाहाला विरोध होतो, आंतरजातीय विवाहांना विरोध होतो. या मानसिकतेत बदल घडला पाहिजे. चांगल्या गोष्टींना पाठिंबा मिळाला पाहिजे. ज्या गोष्टी चुकीच्या आहेत त्यांच्या बाबतीत जातीपातीचं, धर्माचं, संस्कृतीचं, प्रांतांच कुठलंही राजकारण न आणता शासनाने त्यांना अटकाव केला पाहिजे. याबाबतीत गंभीरपणे विचार झाला पाहिजे.

लैंगिक शिक्षणाचा अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमात करताना पुस्तकं माहितीपूर्ण केली पाहिजेत. शास्त्रीय भाषेत माहिती दिली पाहिजे. आवश्यक त्याप्रमाणात आकडेवारीचा वापरही माहितीत केला पाहिजे. उदाहरणार्थ, कंडोमसारख्या गोष्टींची, गर्भपाताच्या गोळ्यांची विक्री किती होते, लैंगिक शक्ती वाढवणारी औषधं किती आहेत आणि त्यांचा खप किती आहे, बलात्कार-विनयभंगाच्या किती घटना घडतात, किती आरोपी पकडले गेले, त्यांना शिक्षा किती झाली, खटला किती काळ चालला वगैरे. ही आकडेवारी लैंगिकतेसंबंधी समाजातील स्थिती स्पष्ट करते. लैंगिक अत्याचारांच्या खटल्यांबाबतीत आपल्या न्यायप्रक्रियेत मोठ्या सुधारणा झाल्या पाहिजेत, ती गतिमान झाली पाहिजे. असे अत्याचार

करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाल्या पाहिजेत. माझ्या मते, अशाप्रकारचे गुन्हे जे वारंवार करतात, त्यांना नपुंसक बनवलं पाहिजे. त्यामुळे जरब निर्माण होऊ शकेल. स्त्रीला देहविक्रय करायला भाग पाडणारे दलाल, सामूहिक बलात्कार करणारे अशा लोकांना कठोर शासन झालं पाहिजे.



लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम आपल्या समोर आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, वीज, नोकरी-धंदे सगळ्याच बाबतीत प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. ही अनिष्ट स्पर्धा आहे; कारण या साऱ्या गोष्टी मर्यादित आहेत आणि त्यांचा उपभोग घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. या अनिष्ट स्पर्धेमुळे डोनेशन, भ्रष्टाचार, वशिलेबाजी यांनी समाज दूषित झाला आहे. माणसाकडून माणसाचं शोषण होत आहे. यासाठी लोकसंख्या नियंत्रणाचा संदेश तळागाळा-पर्यंत पोहोचला पाहिजे. आपण समाजाला सुसंस्कृत बनवलं पाहिजे. लवकरात लवकर या समस्येत हात घालून हे गटार साफ केलं गेलं तर ते फायद्याचं ठरेल, अन्यथा समाजाची अपरिमित हानी होईल.

| वर्षं | लोकसंख्या |
|---|---|
| १९४१ | ३१.८१ कोटी |
| १९५१ | ३६.११ कोटी |
| १९६१ | ४३.९२ कोटी |
| १९७१ | ५४.८२ कोटी |
| १९८१ | ६८.३३ कोटी |
| १९९१ | ८४.६४ कोटी |
| २००१ | १०२.८७ कोटी |
| २०११ | १२१.०२ कोटी |